“ नागरी संरक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई” यांच्या आस्थापनेवरील राज्य फिरते नागरी आणीबाणी सेनास्तंभ, मुंबई या कार्यालयातील एकूण १०६ अस्थायी पदांना मुदतवाढ मिळणेबाबत.

महाराष्ट्र शासन

गृह विभाग

शासन निर्णय क्रमांक : सीडीएम-२०१७/प्र.क्र. १३८/विशा-८

हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२,

दिनांक : १९ मार्च, २०१८

वाचावे : १) वित्त विभाग, शासन निर्णय क्रमांक : पदनि-२०१६/प्र.क्र. ८/१६/ आ.पु.क., दिनांक ०५.०३.२०१८

२) गृह विभाग, शासन निर्णय क्र. सीडीएम-२०१७/प्र.क्र. १३८/ विशा-८, दि. २९.०१.२०१८

३) संचालक, नागरी संरक्षण, महाराष्ट्र राज्य,मुंबई यांचे पत्र क्रमांक : नासंसं/ का-३/३१/प्र.क्र.१/मुदतवाढ/फि.द./२०१८/३४२, दि. ०३.०३.२०१८

प्रस्तावना:

नागरी संरक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या अधिपत्याखालील राज्य फिरते नागरी आणीबाणी सेनास्तंभ, मुंबई या कार्यालयातील एकूण १०६ अस्थायी पदांना दि. ०१.०१.२०१८ ते दि. २८.०२.२०१८ पर्यंत संदर्भ क्रमांक २ अन्वये मुदतवाढ देण्यात आली होती. सदर मुदतवाढ दि. २८.०२.२०१८ रोजी संपली आहे. वित्त विभाग, शासन निर्णय, दि. ०५.०३.२०१८ अन्वये आकृतीबंधात समाविष्ट असलेल्या अस्थायी पदांना तसेच, यापूर्वी आढावा मंजूर केल्यानंतर निर्माण करण्यात आलेल्या परंतु ज्यांचा समावेश आकृतीबंधात करण्यात आलेला नाही, अशा अस्तित्वात असलेल्या सर्व अस्थायी पदांना दिनांक ०१.०३.२०१८ ते दि. ३०.०९.२०१८पर्यंत मुदतवाढ देण्याचे अधिकार प्रशासकीय विभागांना देण्यात आले आहेत. तसेच दि. ३०.०९.२०१८ पूर्वी कोणत्याही परिस्थितीत कार्यालयांच्या आस्थापनेवरील मंजूर पदांचा आढावा घेऊन, सुधारित आकृतीबंधास उच्चस्तरीय समितीची मान्यता घेणे आवश्यक आहे. या अटीच्या अधीन राहून नागरी संरक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या अधिपत्याखालील राज्य फिरते नागरी आणीबाणी सेनास्तंभ, मुंबई या कार्यालयातील एकूण १०६ अस्थायी पदांना दि. ०१.०३.२०१८ ते दि. ३०.०९.२०१८ पर्यंत मुदतवाढ देण्याची बाब विचाराधीन होती. त्यास अनुसरुन शासन खालीलप्रमाणे निर्णय घेत आहे.

शासन निर्णय :-

नागरी संरक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या अधिपत्याखालील राज्य फिरते नागरी आणीबाणी सेनास्तंभ, मुंबई या कार्यालयातील आकृतीबंधात समाविष्ट असलेल्या अस्थायी पदांना तसेच, यापूर्वी आढावा मंजूर केल्यानंतर निर्माण करण्यात आलेल्या परंतु ज्यांचा समावेश आकृतीबंधात करण्यात आलेला नाही, अशा अस्तित्वात असलेल्या सोबतच्या प्रपत्रात नमूद एकूण १०६ अस्थायी पदांना दि. ०१.०३.२०१८ ते दि. ३०.०९.२०१८ पर्यंत मुदतवाढ देण्यात येत आहे.

दि. ३०.०९.२०१८ पूर्वी सुधारीत आकृतीबंधास उच्चस्तरीय सचिव समितीची मान्यता घेणे आवश्यक असल्याने सुधारीत आकृतीबंधाचा प्रस्ताव शासनास तात्काळ सादर करण्याची दक्षता नागरी संरक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई या कार्यालयाने घ्यावी.

२. या पदांवर होणारा खर्च मागणी क्र.बी.-१ मुख्य लेखाशीर्ष “२०७०-इतर प्रशासनिक सेवा (१०६) नागरी संरक्षण (चार) राज्य फिरते नागरी आणीबाणी सेनास्तंभ-वेतन” या लेखाशिर्षाखाली वर्ग करण्यात यावा.सदरचा खर्च वित्तीय वर्षासाठी मंजूर अनुदानातून भागविण्यात यावा.

३. हा शासन निर्णय वित्त विभाग क्रः पदनि-२०१६/प्र.क्र. ८/आ.पु.क., दिनांक ०५.०३.२०१८ अन्वये अस्थायी पदांना मुदतवाढ देण्याबाबत प्रशासकीय विभागास प्रदान केलेल्या अधिकारास अनुसरुन निर्गमित करण्यात येत आहे.

४. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आला असून त्यांचा संकेताक क्र. २०१८०३१९१५३५११७७२९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने सांक्षाकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Deepak Vasant Sawant

Digitally signed by Deepak Vasant Sawant
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Home Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=43cdfecb6fd26ff7b1b970520962ebf72d86546b92151214820b2bb31f3ccac8, serialNumber=66ea8e25496abe127ddbfd3157e10ae5a1fb12e738b63f8a5b2cb92885fd1f05, cn=Deepak Vasant Sawant
Date: 2018.03.19 15:38:55 +05'30'

(दि.व. सावंत)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

सोबत : प्रपत्र-अ

प्रत:

१) संचालक, नागरी संरक्षण संचालनालय,महाराष्ट्र राज्य,मुंबई.
२) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र-१, मुंबई.
३) महालेखापाल (लेखा परीक्षा) महाराष्ट्र-१, मुंबई.
४) अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
५) निवासी लेखा परिक्षा अधिकारी, मुंबई.
६) वित्त विभाग (व्यय-८)/वित्तीय सुधारणा-१, मंत्रालय,मुंबई.
७) निवड नस्ती, विशा-८

गृह विभाग, शासन निर्णय क्रमांक : सीडीएम-२०१७/प्र.क्र. १३८/विशा-८, दिनांक: १९ मार्च, २०१८ सोबतचे

प्रपत्र-अ

राज्य फिरते नागरी आणीबाणी सेनास्तंभ, मुंबई.

अस्थायी पदांचा तपशिल

अ.क्र.	पदनाम	वेतनश्रेणी व ग्रेडवेतन	संख्या
१	२	३	४
गट-ब			
१	वरिष्ठ सहाय्यक उपनियंत्रक (अग्नि)	रु.१५६००-३९१०० (६६००)	१
२	वरिष्ठ सहाय्यक उपनियंत्रक (विमोचन)	रु.१५६००-३९१०० (६६००)	१
गट- क			
३	तांत्रिक सहाय्यक श्रेणी-१	रु.९३००-३४८०० (४३००)	१
४	वरिष्ठ लिपिक	रु.५२००-२०२०० (२४००)	१
५	लेखा लिपिक	रु.५२००-२०२०० (२४००)	२
६	जोडारी यांत्रिक	रु.५२००-२०२०० (२४००)	१
७	संधाता	रु.५२००-२०२०० (२४००)	१
८	स्वयंवीजतंत्री	रु.५२००-२०२०० (२४००)	१
९	तांत्रिक सहाय्यक श्रेणी-२	रु.५२००-२०२०० (२४००)	१
१०	प्रमुख अग्निशामक विमोचक	रु.५२००-२०२०० (२०००)	१०
११	चालक यंत्र चालक	रु.५२००-२०२०० (२०००)	८
१२	सहाय्यक स्वयंवीजतंत्री	रु.५२००-२०२०० (२०००)	१
१३	विजतंत्री	रु.५२००-२०२०० (२०००)	१
१४	सहाय्यक जोडारी	रु.५२००-२०२०० (२०००)	१
१५	अग्निशामक विमोचक	रु.५२००-२०२०० (१९००)	६०
१६	प्रथमोपचारक	रु.५२००-२०२०० (१९००)	३
१७	चालक	रु.५२००-२०२०० (१९००)	२
१८	भांडारपाल	रु.५२००-२०२०० (१९००)	२
१९	लिपिक टंकलेखक	रु.५२००-२०२०० (१९००)	३
गट-ड			
२०	सहाय्यक स्वयंपाकी	रु.४४४०-७४४० (१३००)	१
२१	तांत्रिक सहाय्यक स्वच्छक	रु.४४४०-७४४० (१३००)	१
२२	भोजनालय सेवक	रु.४४४०-७४४० (१३००)	१
२३	सफाईगार	रु.४४४०-७४४० (१३००)	२
	एकूण पदे		१०६